# महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

**" मिडिया मॅनेजर " हे पद तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वाने भरण्याबाबत**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ हे गोरेगाव (पूर्व) येथे कार्यरत असून महामंडळाच्या सुमारे ५०० एकर जागेतील बाह्य चित्रिकरण स्थळे व स्टुडिओ चित्रपट, दुरदर्शन मालिका व जाहिराती यांच्या चित्रीकरणासाठी भाड्याने देण्यात येतात. सद्यस्थितीत मुंबई व मुंबई उपनगराच्या परिसरात अनेक खाजगी चित्रिकरण स्थळे विकसित झाली आहेत. त्यामुळे महामंडळास व्यावसायिक स्पर्धेस तोंड द्यावे लागत आहे. निर्मात्यांना महामंडळाच्या परिसरात चित्रिकरणाच्या दृष्टीने अद्यावत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा महामंडळाचा नेहमीचाच मानस आहे. याचाच भाग म्हणून मेकअप रुम /कलागारे यांचे अद्यावतीकरण तसेच इतर सुविधा व सवलतीही महामंडळाकडून देण्यात येत आहे. सदर बाबी संबंधितांपर्यंत पोहचविण्यास महामंडळास मर्यादा पडत आहे. ही बाब विचारात घेऊन महामंडळाकडून हाती घेण्यात येणारे प्रकल्प देण्यात येणाऱ्या सुविधा याबाबतची माहिती प्रसार माध्यमांद्वारे संबंधितांपर्यंत पोहचविण्यासाठी पत्रकारिता व माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील जाणकार व्यक्तीची मिडिया मॅनेजर म्हणून प्रथम १ वर्षासाठी (कालावधी कमी/जास्त) करण्याचे अधिकार महामंडळाचे स्वाधीन) कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

**१. पदसंख्या** : १ (एक)

**२. अर्हता** :अ) पत्रकारिता Journalism व Mass Communication या विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदविका

ब) वृत्तपत्र /प्रसारमाध्यमे यामध्ये काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव

क) शासकीय सेवेत उदा. माहिती व जनसंपर्क संचालनालय, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयात काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

ड) प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य,

**३. वित्तलब्धी** : पात्रता व अनुभव विचारात घेऊन ठराविक मासिक वेतन निश्चित करण्यात येईल.

**४. पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. चित्रनगरी महामंडळाकडून हाती घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची दृक व श्राव्य प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरात व कार्यक्रमोत्तर प्रसिध्दी देणे

२. महामंडळाची राष्ट्रीय तसेच अंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमांद्वारे प्रयत्न करणे.

३. सोशल मिडियाद्वारे महामंडळाच्या कामकाजाची माहिती जनतेपर्यंत पोहचविणे.

४. व्यावसायिक स्पर्धेत टिकुन राहण्यासाठी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा संबंधितांपर्यंत पोहचविणे

५. महामंडळाच्या व्यवसाय वाढीस हातभार लावणे.

वरील अर्हता धारण करणाऱ्या **उमेदवारांनी दि. १५.०४.२०२१ पर्यत** शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या साक्षांकित कागदपत्रासह खालील पत्यावर किंवा **mdmfscdc@gmail.com** या इमेल आयडीवर ऑन लाईन अर्ज करावा.

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित,**

**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.**

प्राप्त होणाऱ्या अर्जाची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांची अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. सुयोग्य उमदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक

म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

**" समन्वय अधिकारी" यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याबाबत.**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ हे गोरेगाव (पूर्व) येथे कार्यरत असून महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी या ५०० एकरांपेक्षा जास्त क्षेत्राच्या जागेत बाह्यचित्रिकरण स्थळे व कलागारे स्थित आहेत. चित्रपट, जाहिराती व दुरदर्शन मालिकांच्या चित्रिकरणासाठी उपलब्ध सुविधांचे अद्यावतीकरण करुन जागतिक स्तरावरील सेवा निर्मात्यांना प्रदान करण्यासाठी महामंडळ प्रयत्नशील आहे. महामंडळाच्या उपरोक्त प्रयत्नांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तांत्रिक पार्श्वभूमी असलेल्या व प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या सेवांतर्गत /सेवानिवृत्त श्रेणी ‘अ’ अधिकाऱ्याची ‘समन्वय अधिकारी’ (Coordinating Officer) म्हणून प्रथम १ वर्षासाठी (कालावधी कमी/जास्त) करण्याचे अधिकार महामंडळाचे स्वाधीन) कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

**१. पदसंख्या** : १ (एक)

**२. अर्हता** :अ) स्थापत्य अभियांत्रिकीतील मान्यताप्राप्त विद्यापीठ /तंत्र शिक्षण मंडळ यांची पदवी किंवा पदविका

आ) प्रशासकीय सेवेत ‘अ’ दर्जाचा अधिकारी म्हणून किमान १५ वर्षे सेवेचा अनुभव

इ) शासनाच्या महसूल, भूसंपादन, पुनर्वसन, नगरविकास या क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य देण्यात येईल

**३. वित्तलब्धी** : पात्रता, अनुभव व प्रचलित शासकीय नियम विचारात घेऊन वेतन निश्चित करण्यात येईल.

**४. पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या आवारातील झोपडपट्टयांत राहणाऱ्या कुटुंबांची शासकीय निकषाप्रमाणे पात्र/अपात्रता ठरविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे पाठपुरावा करणे व त्यांच्या पुनर्वसनासाठी कृती आराखडा तयार करणे आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी संबंधित शासकीय विभाग व महानगरपालिका यांच्याशी समन्वय साधणे.

२. दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या आवारात उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधा विकास (Infrastructure Development) गुणवत्तापूर्ण नियोजनसाठी तज्ञांनी तयार केलेल्या प्रकल्प अहवालाची तपासणी करणे, त्याची मान्यता व अंमलबजावणीसाठी विविध विभाग व तज्ञ यांच्याशी समन्वय साधणे.

वरील अर्हता धारण करणाऱ्या **उमेदवारांनी दि. १५.०४.२०२१ पर्यंत** शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या साक्षांकित कागदपत्रासह खालील पत्यावर किंवा **mdmfscdc@gmail.com** या इमेल आयडीवर ऑन लाईन अर्ज करावा.

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित,**
**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.**

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांची अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. सुयोग्य उमदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

**" मिडिया मॅनेजर " व " समन्वय अधिकारी " ही पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वाने भरण्याबाबत**

| | | |
|---|---|---|
| १ | **कार्यालयाचे नांव** | महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित |
| २ | **पदनाम व पदसंख्या :-** | १) मिडिया मॅनेजर- १ पद |
| | | २) समन्वय अधिकारी - १ पद |
| ३ | **पदाचे स्वरुप व कालावधी :-** | कंत्राटी तत्वावर, १ वर्ष |
| ५ | **अर्ज उपलब्धतेचे ठिकाण :-** | **www.filmcitymumbai.org** |
| ६ | **अर्ज पाठविण्याचे ठिकाण :-** | mdmfscdc@gmail.com |
| ७ | **अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक :-** | १५/०४/२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ८ | **निवड पध्दत :-** | मुलाखतीव्दारे |
| ९ | **अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी शर्ती यांचा तपशिल www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.** | |

स्वाक्षरी

व्यवस्थापकीय संचालक

म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

अर्जाचा नमुना

**चित्रनगरी महामंडळातील " समन्वय अधिकारी " या कंत्राटी तत्वावरील पदासाठी अर्ज.**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई-मेल | |
| ५ | दुरध्वनी/मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी | |
| ८ | सेवा केलेल्या कार्यालयांचा तपशिल व कालावधी | |
| ९ | सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| १० | निवृत्ती वेतन मिळत असल्यास, निवृत्ती वेतनाची रक्कम | |

आपला विश्वासू,

अर्जाचा नमुना

**चित्रनगरी महामंडळातील " मिडिया मॅनेजर " या कंत्राटी तत्वावरील पदासाठी अर्ज.**

| | | |
|---|---|---|
| **१** | **अर्जदाराचे नांव** | |
| **२** | **जन्म तारीख** | |
| **३** | **पत्रव्यवहारासाठी पत्ता** | |
| **४** | **ई-मेल** | |
| **५** | **दुरध्वनी/मोबाईल क्रमांक** | |
| **६** | **शैक्षणिक अर्हता** | |
| **७** | **अनुभव** | |
| **८** | **शासकीय सेवेत असल्यास** | |
| | **१) सेवा केलेल्या कार्यालयांचा तपशिल व कालावधी** | |
| | **२) सेवा निवृत्ती दिनांक** | |
| | **३) सेवा निवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद** | |
| | **४) निवृत्ती वेतन मिळत असल्यास, निवृत्ती वेतनाची रक्कम** | |

आपला विश्वासू,